॥ सा विद्या या विमुक्तये ॥

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

Fax : (02462) 299574 — POST GRADUATION SECTION — website: srtmun.ac.in

Ext. No 143, 153 — E-mail: dr.pg.srtmun.ac.in

संदर्भ:पदव्युत्तर/प्री.पीएच.डी कोर्सवर्क/पेट २२/२०२२–२३/ 2502 दि. ०२/०१/२०२३

## परिपत्रक

**विषय: पेट २०२२ मार्फत आलोकेशन देण्यात आलेल्या संशोधक विद्यार्थ्यांच्या प्री. पीएच.डी कोर्सवर्क आयोजना बाबत.**

या परिपत्रकान्वये पीएच. डी संशोधन केंद्राचे प्रमुख, सर्व (संलग्नित महाविद्यालये), तसेच विद्यापीठ संकुले, विद्यापीठ उपकेंद्र येथिल संशोधन मार्गदर्शक व संशोधक विद्यार्थ्यांना मा. कुलगुरू महोदयाच्या आदेशान्वये सविनय कळविण्यात येते की,

१. पेट २०२२ मार्फत आलोकेशन देण्यात आलेल्या सर्व संशोधक विद्यार्थ्यांसाठी प्री. पीएच.डी कोर्सवर्क चे आयोजन करण्यात आले असुन संशोधक विद्यार्थ्यांचे आलोकेशन ज्या मार्गदर्शकाकडे झालेले आहे ते मार्गदर्शक ज्या संशोधन केंद्राशी संलग्नित आहेत त्या संशोधन केंद्राचे शुल्क (रू. ५,५००/–) भरून संबंधित संशोधन केद्रावर विद्यार्थ्यांनी दि. १० जानेवारी २०२३ पर्यंत रूजू व्हावे.

२. संबंधित संशोधन केंद्रावर संलग्नित असलेल्या मार्गदर्शका अंतर्गत नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांसाठी, ऑनलाईन /ऑफलाईन पध्दतीने कोर्सवर्कचे आयोजन सर्व संशोधन केंद्रानी करावे. जर संशोधन केंद्राकडे विद्यार्थी रूजू झाला, फिस भरली व कोर्सवर्कचे आयोजन संशोधन केंद्राने केले नाही तर विद्यार्थ्यांचे नुकसान होउ शकते. त्याची जबाबदारी संबंधित संशोधन केंद्राची असेल जर एखादया संशोधन केंद्रास कोर्सवर्कचे आयोजन करणे शक्य नसेल तर त्यांनी आपल्या संशोधन केंद्रावरील विद्यार्थ्यांना इतर संशोधन केंद्रावर पाठविण्यासाठी विद्यापीठाची मान्यता घ्यावी.

३. विद्यार्थ्यांची आलोकेशन ची तारिख हिच नोंदणीची तारिख राहिल.

४. संशोधक विद्यार्थ्यांनी संबंधित संशोधन केंद्रावर दि. २० जानेवारी २०२३ पर्यंत कोर्सवर्क शुल्क रू. २,२००/— भरून प्रवेश घ्यावा. संबंधित संशोधन केंद्रानी अशा विद्यार्थ्यांना आलोकेशन पत्राच्या आधारे व संबंधित संशोधन मार्गदर्शक ज्या केंद्राशी संलग्नित आहेत अशा केंद्रावर रूजू करून घ्यावे.

५. वरील प्रमाणे दि. २० जानेवारी २०२३ पर्यंत कोर्सवर्कसाठी रूजू झालेल्या विद्यार्थ्यांची यादी एक प्रत पदव्युत्तर विभाग व एक प्रत परिक्षा विभागास सर्व संशोधन केंद्रानी दि. ३१/०१/२०२३ पर्यंत पाठवावी.

कोर्सवर्कचे शिकवणी वर्ग दि. ०१/०२/२०२३ ते दि. ३०/०४/२०२३ पर्यंत संशोधन केंद्रात घेण्यात यावेत. विद्यापीठ संकुलातील संशोधक विद्यार्थ्यांचे वर्ग ऑनलाईन/ ऑफलाईन पध्दतीने होतील.

७. मा. विद्या परिषदेमध्ये झालेल्या निर्णयानुसार पेट २०२२ मार्फत मार्गदर्शक प्राप्त सर्व विद्यार्थ्यांना प्रथम पीएच.डी कोर्सवर्क पुर्ण करावा लागेल. कोर्सवर्क मध्ये 1. Research Methodology 2. Computer Application 3. Research & Publication Ethics या विषयाची परिक्षा दयावी लागेल व त्याचा निकाल घोषित झाल्यानंतर, जे संशोधक पीएच.डी कोर्सवर्क मधील वरील तीन पेपर मध्ये उत्तीर्ण होतील त्यांनीच या विषयाच्या निकालाच्या प्रतीसह संशोधन आराखडा ( **Pre-Synopsis** ) विद्यापीठ पदव्युत्तर विभागात सादर करावा. जे संशोधक विद्यार्थी कोर्सवर्क उत्तीर्ण होतील त्यांनाच आर.आर.सी. मार्फत विषय मान्यता देउन नोंदणी कायम करण्यात येईल. आर.आर.सी. बैठकीचे शेडयुल विद्यापीठ संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल.

८. पेट २०२० पुर्वी प्रवेशित ज्या विद्यार्थ्यांनी अद्याप कोर्सवर्क पुर्ण केला नाही त्यांना हि या कोर्सवर्कसाठी प्रवेश देता येईल. मात्र अशा विद्यार्थ्यांनी पेट २०२० पासुन लागु करण्यात आलेल्या कोर्सवर्क मधील तीन विषयाचा कोर्सवर्क करावा लागेल.

सहा. कुलसचिव
पदव्युत्तर विभाग

प्रत कार्यवाहीस्तव.

१. मा. संशोधन केंद्र प्रमुख, (संलग्नित महाविद्यालय), प्रस्तुत विद्यापीठ
२. मा. संशोधन केंद्र प्रमुख, विद्यापीठ संकुले, व उपकेंद्र, प्रस्तुत विद्यापीठ यांना देउन विनंती की, आपल्या संशोधन केंद्रावर नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांची माहिती डॉ. सी. आर. बाविस्कर, (समन्वयक कोर्सवर्क पेट २०२२) शिक्षणशास्त्र संकुल, प्रस्तुत विद्यापीठ यांना दयावी. जेणे करून कोर्सवर्कचे आयोजन करता येईल.

प्रत माहितीस्तव सादर.

१. मा. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ यांना सविनय सादर.
२. मा. प्र. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ यांना सविनय सादर.
३. मा. संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ, प्रस्तुत विद्यापीठ यांना देउन विनंती की, वरील प्रमाणे कोर्सवर्क पुर्ण करणा—या विद्यार्थ्यांच्या कोर्सवर्क परीक्षेचे आयोजन तसेच अंतर्गत गुण स्विकारण्याची कार्यवाही व्हावी, हि विनंती.